**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२६५**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १८ जून, २०२०

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे झालेल्या २६५ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

**सचिव,**
**कार्यकारी समिती (अ.का.)**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. जयंत कुमार बांठिया
१००३/१००४, १० वा मजला,
बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,
लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),
मुंबई – ४०० ०५३ - सदस्य

श्री. ना. वि. मेराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

.. २

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

****

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६५व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **३० एप्रिल, २०२० (गुरूवार)** |
| **वेळ** | : | **सकाळी ११.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **मा. मुख्य सचिव यांचे निवासस्थान<br>ए-१०, मंत्रालय समोर,<br>मुंबई – ४०० ०३२.<br>दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे** |

**उपस्थित सदस्य :**

श्री. अजोय मेहता - अध्यक्ष
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन

श्री. जयंत कुमार बाँठिया - सदस्य

श्री. प्रवीण परदेशी - सदस्य
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. आर.ए.राजीव - सदस्य
महानगर आयुक्त
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

श्री. आय.एस.चहल - सदस्य
प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री. लोकेशचंद्र - सदस्य
व्यवस्थापकीय संचालक,
सिडको, मुंबई

**निमंत्रित :**

श्री. महेश पाठक
प्रधान सचिव (२)
नगर विकास विभाग व प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग (अतिरिक्त कार्यभार),
महाराष्ट्र शासन

श्री. वेणूगोपाळ रेड्डी
प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन

डॉ. सोनिया सेठी
अतिरिक्त महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. बी.जी.पवार
सह-महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.भारत मोडगीळ
वरिष्ठ संचालक (प्रणाली), एकत्रिकरण,
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. डी.टी.ठुबे
मुख्य अभियंता
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. राजेंद्र गोटाफोडे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सु.भू.पेदे
सचिव, कार्यकारी समिती
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, कार्यकारी समितीचे नवे पदसिध्द सदस्य श्री. आय.एस.चहल, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग तसेच नवे पदसिध्द निमंत्रित सदस्य श्री. महेश पाठक, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग व प्रधान सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग आणि श्री. वेणूगोपाळ रेड्डी, प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या २६४व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या २६४व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र. ३ : मेट्रो मार्ग-७ च्या पॅकेज – १ मधील चार स्थानकांच्या स्थापत्य कामांसाठी (सीए-९२) मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मेट्रो मार्ग - ७ अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) या प्रकल्पाच्या पॅकेज १ साठीच्या स्थापत्य बांधकामासाठी मे. सिंम्प्लेक्स यांना दिनांक ९ मे, २०१६ रोजी कार्यारंभ आदेश दिला. मे. सिंम्प्लेक्स यांनी दिनांक १ जून, २०१६ रोजी स्थापत्य बांधकामास सुरुवात केली व कामे ३० महिन्यात म्हणजेच दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते. मे. सिंम्प्लेक्स यांना वेळोवेळी मेट्रो बांधकामात असमाधानकारक प्रगती विषयी पत्राव्दारे, नोटीसीव्दारे कळविण्यात आले होते. तसेच महानगर आयुक्त आणि अति. महानगर आयुक्तांसोबत साप्ताहिक व प्रती माह बैठकांव्दारे तसेच संयुक्त पाहणी दरम्यान निदर्शनास आणून दिले होते. मे. सिंम्प्लेक्स यांना शेवटची संधी देण्याच्या उद्देशाने ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला मे. सिंम्प्लेक्स यांच्या संचालकांसोबत बैठक घेण्यात आली, त्यानुसार मे. सिंम्प्लेक्स यांनी

दिनांक १८ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या पत्राव्दारे कामाचे वेळापत्रक सादर केले त्यामध्ये मार्च, २०२० पर्यंत स्थापत्य काम पूर्ण करण्याचे नमुद केले होते. परंतू सदर प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी अंदाजे ९% प्रति माह प्रगती साध्य करणे आवश्यक असतानासुध्दा मे. सिंम्प्लेक्स यांची ऑक्टोबर, २०१९ ते जानेवारी, २०२० या चार महिन्यातील सरासरी प्रगती ०.४३% प्रति महिना असल्याचे दिसून आली होती.

३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. सिंम्प्लेक्स यांना बांधकामात प्रगती करण्यास दिलेली संधी, विविध सुचना, चेतावनी लक्षात घेता कंत्राटातील अटींप्रमाणे मे. सिंम्प्लेक्स यांचे दिनांक २८.०१.२०२० रोजी मेट्रो मार्ग ७ च्या पॅकेज - १ मधील कंत्राट बरखास्त (Terminate) करण्यात आले. कंत्राटातील अटींनुसार रु. ३४.८३ कोटी अनामत रक्कमेची बँकेची हमी ही रोखीत बदलण्यात (encash) आली.

३.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) / प्रकल्प संचालक यांनी सदर प्रस्तावाचे तपशिलवार पॉवर पॉईन्टव्दारे सादरीकरण केले आणि प्रस्तावासंदर्भात माहिती दिली. पॅकेज-१ मधील उर्वरित बांधकामाची व्याप्ती व जलद गतीने अंमलबजावणी करण्यासाठी सामान्य सल्लागाराने उर्वरीत कामे पुर्णत्वासाठी दोन निविदांमार्फत जसे उर्वरीत उन्नत मार्ग (viaduct) व उर्वरीत स्थानकांची (stations) कामे अशा प्रकारे निविदा मागविण्याची शिफारस केल्याप्रमाणे दोन निविदा मागविण्यात आल्या. उर्वरित चार उन्नत मेट्रो स्थानकांच्या स्थापत्य बांधकामासाठी अंदाजपत्रकीय किंमत रु. १०३.८९ कोटी इतकी होती. मेट्रो मार्ग - ७ च्या स्थानकांच्या उर्वरीत (CA-९२) स्थापत्य बांधकामाकरीता दिनांक २९.०१.२०२० रोजी ई निविदा सूचना वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आली.

दिनांक २५.०२.२०२० रोजी निविदा निविदाकारांमार्फत सादर करण्यात आल्या. दिनांक २७.२.२०२० रोजी निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष निविदा उघडण्यात आल्या. खालील निविदाकारांनी ई निविदा सादर केल्या :-

१. मे. जे. कुमार इनफ्राप्रोजेक्टस लि.

२. मे. एन.सी.सी. लिमिटेड

३. मे. टाटा प्रोजेक्टस लि.

३.४ सामान्य सल्लागारांमार्फत ई निविदाकारांच्या पात्रतेची व तांत्रिक छाननी करण्यात आली. सामान्य सल्लागारांचा दिनांक २८.०२.२०२० रोजी प्राप्त झालेल्या अहवालानुसार तिन्ही निविदाकार तांत्रिक छाननीत पात्र असल्याचे नमुद केले. निविदेतील अटीनुसार एका निविदाकारास एकच कंत्राट देण्याचे स्पष्ट करण्यात आले होते. तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) CA-९२ साठी दिनांक २८.०२.२०२० रोजी उघडण्यात आले. निवीदेतील अट क्र. १.१.३.१ii (अ) नुसार अनियत पध्दतीने सर्व प्रथम CA-९१ मधील तिन्ही पात्र निविदाकारांचे लिफाफे उघडण्यात आले. त्यानुसार CA-९१ मधील लघुत्तम निविदाकारांचे वित्तीय लिफाफे CA-९२ साठी उघडण्यात आले नाहीत. तद्नंतर CA-९२, दोन्ही पात्र निविदाकारांचें वित्तीय लिफाफे उघडण्यात आले. तसेच उघडलेल्या सर्व वित्तीय लिफाफ्यांची छाननी सामान्य सल्लागारांमार्फत करण्यात आली व वित्तीय अहवाल प्राधिकरणास सादर केला. तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

**रु. कोटीत**

| **अ.क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **निविदेची रक्कम** | **प्राप्त रक्कम** |
|---|---|---|---|
| १. | मे.एन.सी.सी. लिमीटेड | १०३.८९ | **१३७.१४<br>(+३२.००%) लघुत्तम** |
| २. | मे. टाटा प्रोजेक्टस लि. | | १४२.८५<br>(+३७.५%) |

३.५ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) / प्रकल्प संचालक यांनी असेही सांगितले की, सदर लघुत्तम देकार व अंदाजपत्रकात असलेला अधिकचा भाव फरक लक्षात घेता कंत्राटदारांमार्फत अधिकच्या देकारासंबंधी स्पष्टीकरण मागविण्यात आले. कंत्राटदाराने दिलेल्या स्पष्टीकरणाचा सामान्य सल्लागाराने बारकाईने अभ्यास केला. सामान्य सल्लागाराने स्वतंत्रपणे केलेल्या मुल्यांकनाप्रमाणे अधिकचा भाव फरक खालील मुख्य अडथळे/आव्हानांमुळे येत असल्याचे नमुद केले :-

(१) पॅकेज-१ मधील उर्वरीत कामे करण्यासाठी साधारण ९ ते ११ महिन्यांच्या कालावधीची आवश्यकता होती. परंतु प्रकल्पाची उद्दिष्टे गाठण्यासाठी प्रकल्प कालावधी ६ महिने पावसाळयासह ठेवण्यात आला. सदर कामे ६ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे आव्हानात्मक आहे. यशस्वी निविदाकारास कामाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जास्त प्रमाणात यंत्रसामुग्री व मनुष्यबळांमार्फत सदर कामे करणे अनिवार्य आहे.

(२) उर्वरीत कामे पुर्ण करण्याचा कालावधी अतिशय कमी असुन मुख्यत्वे पावसाळयात मुख्य कामे करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत अधिकचे मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीची संख्या वाढविणे अनिवार्य आहे. तसेच पावसाळा व कामांची व्याप्ती लक्षात घेता मनुष्यबळ व यंत्रसामग्रीची निष्पत्ती (outcome) केवळ ५०% असते.

(३) निविदेतील ४ मेट्रो स्थानकांपैकी अंधेरी मेट्रो स्थानकाची लांबी ही २५४ मीटर आहे व सदर स्थानक हे अंतिम स्थानक असून मेट्रो मार्ग १ च्या स्थानकास जोडणारे आहे. सदर स्थानकाचे बांधकाम करणे आव्हानात्मक, अधिकचा वेळ लागणारे आहे.

(४) अंधेरी व जोगेश्वरी उड्डाणपुलांच्या बाजूला असलेल्या निमुळत्या जागेची अडचण, पश्चिम दृतगती महामार्गावरील वर्दळीमुळे सदर स्थानकांचे बांधकाम आव्हानात्मक व अधिक मनुष्यबळामार्फत करणे गरजेचे आहे.

(५) U Girder व I Girder या मेट्रो स्थानकांच्या भागांचे (elements) प्रक्षेपण (launching) करण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री अस्तिवातील उड्डाणपुलांच्या बाजुला असलेल्या निमुळत्या भागात करावयाची आहे. सदर प्रक्षेपणासाठी विशिष्ट प्रकारच्या यंत्रसामग्रीची, कार्यपध्दतीची आवश्यकता असते तसेच सदर प्रक्षेपण करणे हे आव्हानात्मक व जिकीरीचे असते.

(६) कंत्राटदारास स्थानकांच्या बांधकामादरम्यान मेट्रो प्रणालीच्या जसे छताचे, सुशोभिकरणाचे, रेलपथ, उद्वाहन, सरकते जीने, विद्युत कामे, संकेत व दुरसंचार व इतर कंत्राटदारांबरोबर समन्वय ठेवून बांधकाम करणे अनिवार्य आहे.

वरील बाबींचा विचार करता, सामान्य सल्लागाराने अंदाजपत्रकाच्या २३.५०% अधिकचा भार येत असल्याचे नमुद केले. तसेच लघुत्तम निविदाकाराबरोबर वाटाघाटी करण्याचे सुचविले.

३.६ अतिरिक्त महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक यांनी असे नमूद केले की, सामान्य सल्लागाराने सुचविल्याप्रमाणे प्राधिकरणामार्फत लघुत्तम निविदाकारासोबत दि. ०६.०३.२०२० रोजी वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटीअंती लघुत्तम निविदाकाराने रु ९.३६ कोटींची सुट देऊन रु. १२७.७८ कोटींचा म्हणजेच अंदाजपत्रकाच्या २२.९९५% जास्त रक्कमेचा अंतिम देकार सादर करण्यात आला. तसेच महानगर आयुक्त यांनी गठीत केलेल्या

निविदा शिफारस समितीने वरील सर्व बाबीं विचारात घेऊन दिनांक १३.०३.२०२० रोजीच्या बैठकीत लघुत्तम निविदाकार मे. एन.सी.सी. लि. यांचेकडून वाटाघाटीअंती प्राप्त झालेला अंतिम देकार स्विकारण्याची शिफारस केली आहे.

**निर्णय :-** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३८७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे CA-९२ साठी मे. एन.सी.सी. लिमिटेड यांचा वाटाघाटीअंती प्राप्त झालेला अंतिम देकार रु. १,२७,७८,००,०००/- म्हणजेच अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (+) २२.९९५% जास्त लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ४:** **मेट्रो मार्ग-७ च्या पॅकेज – १ मधील उर्वरीत उन्नत मेट्रो मार्गाच्या स्थापत्य कामांसाठी (सीए-९१) मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मेट्रो मार्ग - ७ अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) या प्रकल्पाच्या पॅकेज १ साठीच्या स्थापत्य बांधकामासाठी मे. सिंम्प्लेक्स यांना दिनांक ९ मे, २०१६ रोजी कार्यारंभ आदेश दिला. मे. सिंम्प्लेक्स यांनी दिनांक १ जून, २०१६ रोजी स्थापत्य बांधकामास सुरुवात केली व कामे ३० महिन्यात म्हणजेच दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते. मे. सिंम्प्लेक्स यांना वेळोवेळी मेट्रो बांधकामात असमाधानकारक प्रगती विषयी

पत्राव्दारे, नोटीसीव्दारे कळविण्यात आले होते. तसेच महानगर आयुक्त आणि अति. महानगर आयुक्तांसोबत साप्ताहिक व प्रती माह बैठकांव्दारे तसेच संयुक्त पाहणी दरम्यान निदर्शनास आणून दिले होते. मे. सिंम्प्लेक्स यांना शेवटची संधी देण्याच्या उद्देशाने ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला मे. सिंम्प्लेक्स यांच्या संचालकांसोबत बैठक घेण्यात आली, त्यानुसार मे. सिंम्प्लेक्स यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या पत्राव्दारे कामाचे वेळापत्रक सादर केले त्यामध्ये मार्च, २०२० पर्यंत स्थापत्य काम पूर्ण करण्याचे नमुद केले होते. परंतू सदर प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी अंदाजे ९% प्रति माह प्रगती साध्य करणे आवश्यक असतानासुध्दा मे. सिंम्प्लेक्स यांची ऑक्टोबर, २०१९ ते जानेवारी, २०२० या चार महिन्यातील सरासरी प्रगती ०.४३% प्रति महिना असल्याचे दिसून आली होती.

४.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. सिंम्प्लेक्स यांना बांधकामात प्रगती करण्यास दिलेली संधी, विविध सुचना, चेतावनी लक्षात घेता कंत्राटातील अटींप्रमाणे मे. सिंम्प्लेक्स यांचे दिनांक २८.०१.२०२० रोजी मेट्रो मार्ग ७ च्या पॅकेज - १ मधील कंत्राट बरखास्त (Terminate) करण्यात आले. कंत्राटातील अटींनुसार रु. ३४.८३ कोटी अनामत रक्कमेची बँकेची हमी ही रोखीत बदलण्यात (encash) आली.

४.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) / प्रकल्प संचालक यांनी सदर प्रस्तावाचे तपशिलवार पॉवर पॉईन्टव्दारे सादरीकरण केले आणि प्रस्तावासंदर्भात माहिती दिली. पॅकेज-१ मधील उर्वरित बांधकामाची व्याप्ती व जलद गतीने अंमलबजावणी करण्यासाठी सामान्य सल्लागाराने उर्वरीत कामे पुर्णत्वासाठी दोन निविदांमार्फत जसे उर्वरीत उन्नत मार्ग (viaduct) व उर्वरीत स्थानकांची (stations) कामे अशा प्रकारे निविदा मागविण्याची शिफारस केल्याप्रमाणे दोन निविदा मागविण्यात आल्या. उर्वरित उन्नत मार्गाच्या स्थापत्य बांधकामासाठी अंदाजपत्रकीय किंमत रु. १४९.४५ कोटी इतकी होती. मेट्रो मार्ग - ७ च्या उन्नत मार्गाच्या उर्वरीत (CA-९१) स्थापत्य बांधकामाकरीता दिनांक २९.०१.२०२० रोजी ई निविदा सूचना वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आली.

दिनांक २५.०२.२०२० रोजी निविदा निविदाकारांमार्फत सादर करण्यात आल्या. दिनांक २७.२.२०२० रोजी निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष निविदा उघडण्यात आल्या. खालील निविदाकारांनी ई निविदा सादर केल्या.

१. मे. जे. कुमार इनफ्राप्रोजेक्टस लि.

२. मे. एन.सी.सी. लिमिटेड

३. मे. टाटा प्रोजेक्टस लि.

४.४ सामान्य सल्लागारांमार्फत ई निविदाकारांच्या पात्रतेची व तांत्रिक छाननी करण्यात आली. सामान्य सल्लागारांचा दिनांक २८.०२.२०२० रोजी प्राप्त झालेल्या अहवालानुसार तिन्ही निविदाकार तांत्रिक छाननीत पात्र असल्याचे नमुद केले. तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) CA-९१ साठी दिनांक २८.०२.२०२० रोजी उघडण्यात आले. उघडण्यात आलेल्या वित्तीय लिफाफ्यांची छाननी सामान्य सल्लागारामार्फत करण्यात आली व वित्तीय अहवाल प्राधिकरणास सादर केला. तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

**(रु. कोटीत)**

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम | प्राप्त रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | १४९.४५ | १८३.७६ (+२२.९५%) लघुत्तम |
| २. | मे.एन.सी.सी. लिमीटेड | | १९०.८२ (+२७.६८%) |
| ३. | मे. टाटा प्रोजेक्टस लि. | | १९३.७७ (+२९.६५%) |

४.६ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) / प्रकल्प संचालक यांनी असेही सांगितले की, सदर लघुत्तम देकार व अंदाजपत्रकात असलेला अधिकचा भाव फरक लक्षात घेता कंत्राटदारांमार्फत अधिकच्या देकारासंबंधी स्पष्टीकरण मागविण्यात आले. कंत्राटदाराने दिलेल्या स्पष्टीकरणाचा सामान्य सल्लागाराने बारकाईने अभ्यास केला. सामान्य सल्लागाराने स्वतंत्रपणे केलेल्या मुल्यांकनाप्रमाणे अधिकचा भाव फरक खालील मुख्य अडथळे/आव्हानांमुळे येत असल्याचे नमुद केले :-

(१) पॅकेज-१ मधील उर्वरीत कामे करण्यासाठी साधारण ९ ते ११ महिन्यांच्या कालावधीची आवश्यकता होती. परंतु प्रकल्पाची उद्दिष्टे गाठण्यासाठी प्रकल्प कालावधी ६ महिने

पावसाळयासह ठेवण्यात आला. सदर कामे ६ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे आव्हानात्मक आहे. यशस्वी निविदाकारास कामाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जास्त प्रमाणात यंत्रसामुग्री व मनुष्यबळांमार्फत सदर कामे करणे अनिवार्य आहे.

(२) उर्वरीत कामे पुर्ण करण्याचा कालावधी अतिशय कमी असुन मुख्यत्वे पावसाळयात मुख्य कामे करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत अधिकचे मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीची संख्या वाढविणे अनिवार्य आहे. तसेच पावसाळा व विखुरलेली कामांची व्याप्ती लक्षात घेता मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीची निष्पत्ती (outcome) केवळ ५०% असते.

(३) उर्वरीत उन्नत मार्गात ७ विशिष्ट कमानींचा (special spans), (३४.० मी ते ५२.० मी लांबी) समावेश असुन त्यांचे बांधकाम वर्दळीच्या चौकात व नाल्यांवर करावयाचे आहे. अशा प्रकारची विशिष्ट नैपुण्य असलेली कामे कठीण व अधिकचा वेळ घेणारी असतात. ही कामे करण्यासाठी अधिकच्या मनुष्यबळाची व वेळेची आवश्यकता भासते.

(४) उर्वरीत उन्नत मार्गाची कामे ६.२५ कि.मी. भागात विखुरलेल्या स्वरुपात असुन ०६ महिने कालावधीत करणे अत्यंत जिकिरीचे आहे. कंत्राटदारास यंत्रसामग्री व मनुष्यबळामध्ये वारंवार आवश्यकतेनुसार फेरफार करण्याची निकड लक्षात घेता अधिक वेळ व खर्च अपेक्षित आहे.

वरील बाबींचा विचार करता, सामान्य सल्लागाराने अंदाजपत्रकाच्या १७.५३% अधिकचा भार येत असल्याचे नमुद केले. तसेच लघुत्तम निविदाकाराबरोबर वाटाघाटी करण्याचे सुचविले.

४.७ सामान्य सल्लागाराने सुचविल्याप्रमाणे प्राधिकरणामार्फत लघुत्तम निविदाकारासोबत दि. ०६.०३.२०२० रोजी वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटीअंती लघुत्तम निविदाकाराने रु ९.०० कोटींची सुट देऊन रु. १७४.७६ कोटींचा म्हणजेच अंदाजपत्रकाच्या १६.९३% जास्त रक्कमेचा अंतिम देकार सादर करण्यात आला. तसेच, महानगर आयुक्त यांनी गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीने वरील सर्व बाबीं विचारात घेऊन दिनांक १३.०३.२०२० रोजीच्या बैठकीत लघुत्तम निविदाकार मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचेकडून वाटाघाटीअंती प्राप्त झालेला अंतिम देकार हा वाजवी व रास्त असल्याने स्विकारण्याची शिफारस केली आहे.

**निर्णय: सविस्तर चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र. १३८८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे CA-९१ साठी मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा रु. १७४,७६,३७,२५९/- म्हणजेच अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (+) १६.९३% जास्त रक्कमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे."

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ५: शिवडी ते वरळी उन्नत मार्ग प्रकल्पाच्या बांधकामाकरीता प्राप्त झालेल्या लघुत्तम किंमतीच्या निविदेस मान्यता मिळण्याबाबत.**

५.१ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी प्रकल्पाच्या आखणीबाबत समितीस सादरीकरण केले. प्रकल्पाच्या मार्गरेषेच्या ड्रोनद्वारे केलेल्या सर्वेक्षणाची चित्रफीत समितीस दाखविण्यात आली.

५.२ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी शिवडी - वरळी उन्नतमार्ग प्रकल्पाची लांबी सुमारे ४.५ कि.मी. असून रुंदी सर्वसाधारणपणे १७.२० मी. आहे. प्रस्तावित उन्नतमार्ग शिवडी रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडून सुरू होऊन हार्बर रेल्वेमार्ग पार करून, आचार्य दोंदे मार्गावरून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग पार करून, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ मध्य व पश्चिम रेल्वे मार्ग पार करून, सेनापती बापट मार्गावरील उड्डाणपुल पार करून, जगन्नाथ भातणकर मार्गावरून, कामगार नगर-१ व कामगार नगर-२ येथून डॉ. ॲनी बेझंट मार्ग पार करून नारायण हर्डीकर मार्ग वरळी येथे संपतो असे त्यांनी सांगितले. तसेच आखणीमध्ये जी. डी. आंबेकर मार्ग ते डॉ. ई. बोर्जेस मार्ग यांचे दरम्यानच्या लांबीमध्ये शिवडी-वरळी उन्नत मार्ग मोनोरेलच्या

वरून नेणे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे शिवडी-वरळी उन्नतमार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील उड्डाणपुल व सेनापती बापट मार्गावरील उड्डाणपूलांच्या वरून जातो. यामुळे सदर उन्नतमार्गाची उंची जमिनीपासून सुमारे १५ मीटर ते २७ मीटर इतकी आहे असेही त्यांनी सांगितले. मुंबई पारबंदर प्रकल्पाशी जोडणीव्यतिरिक्त सदर प्रकल्पास शिवडी रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील बाजूस पूर्व मुक्त मार्ग, डॉ. रफी अहमद किडवाई मार्गाशी व आचार्य दोंदे मार्गाशी तसेच वरळी येथे नारायण हर्डीकर मार्ग इ. ठिकाणी जोडण्या (connectivity) देण्यात आल्या आहेत.

५.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे नमूद केले की, सदर पुलाच्या आखणीमध्ये एलफिन्स्टन रोड रेल्वेस्थानकाजवळील (प्रभादेवी रेल्वे स्थानक) १०० वर्षांपेक्षा जास्त जुना असणारा रेल्वे ओलांडणी पुल (Rail-Over-Bridge - ROB) पाडून त्या जागी नवा दुमजली रेल्वे ओलांडणी पुल बांधण्याचे प्रस्तावित आहे. तसेच शिवडी रेल्वे स्थानक येथेही रेल्वे ओलांडणी उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित आहे. या रेल्वे ओलांडणी पुलांच्या बांधकामातील गुंतागुंत (Complexity) लक्षात घेता सदर प्रकल्पाचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने या दोन रेल्वे ओलांडणी पुलांचे संकल्पन व बांधकाम करण्याचे काम महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.

५.४ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे निदर्शनास आणले की, शिवडी-वरळी उन्नतमार्ग प्रकल्पाची सुधारीत अंदाजित किंमत रुपये १२७६ कोटी असल्याचे मा. अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी सांगितले. सदर सुधारीत अंदाजित किंमतीस प्राधिकरणाच्या दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या १४७ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात असून प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजित किंमतीत खालील बाबींचा अंतर्भाव आहे.

१. मा. रफी अहमद किडवाई मार्ग व आचार्य दोंदे मार्ग येथे रॅम्प्स (जोडण्या)
२. एलफिन्स्टन रोड रेल्वेस्थानकाजवळील (प्रभादेवी रेल्वे स्थानक) १०० वर्षांपेक्षा जास्त जुना असणारा रेल्वे ओलांडणी पुल (Rail-Over-Bridge - ROB) पाडून त्या जागी नव्या दुमजली रेल्वे ओलांडणी पुलाचे बांधकाम
३. प्रकल्पाच्या लांबीत ८ ठिकाणी पोलादी गाळे (steel spans).
४. प्रकल्पाच्या लांबीत येणाऱ्या रस्त्याखालील सेवावाहिन्या वळविण्याकरीता येणाऱ्या खर्चापोटी अंदाजित किंमतीच्या १०% इतकी तरतूद

**५.५ प्रकल्पाकरीता निविदा प्रक्रिया :**

५.५.१ प्रकल्पाकरीता मार्च २०१९ मध्ये निविदा बोलाविण्यात आल्या. तथापि निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत एकाच कंत्राटदाराने निविदा सादर केली. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २७ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार प्रथम देकाराच्या वेळी एकमेव निविदा प्राप्त झाल्याने ती स्विकारण्यात आली नाही.

५.५.२ तदनंतर प्रकल्पाची अंदाजित किंमत सा.बां. विभागाच्या सन २०१९-२०२० च्या राज्यस्तरीय दरसूचीनुसार रु. ८७८.५३ कोटी (वस्तु व सेवा करासहीत) अशी अद्यावत करण्यात आली. ऑगस्ट २०१९ मध्ये वृत्तपत्रात तसेच प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिद्ध करून संकल्पन व बांधकाम करणे तत्वावर ठोक रक्कम कंत्राट पध्दतीनुसार दुसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या. सदर निविदा दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ रोजी उघडण्यात आल्या. मे. अ‍ॅफकॉन्स इंफ्रास्ट्रक्चर लि., मे.जे.कुमार इंफ्राप्रोजेक्टस लि., मे. लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो लि. आणि, मे. एन.सी.सी. लि. या चार निविदाकारांनी निविदा सादर केल्या. आर्थिक देकार उघडण्यास पात्र ठरलेल्या या चारही निविदाकारांचे लिफाफा-क (आर्थिक देकार) उघडण्यात आले. निविदाकारांनी सादर केलेल्या आर्थिक देकारांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | आर्थिक देकार रक्कम (वस्तु व सेवा करासहीत) रु कोटी | निविदा रकमेसंदर्भात टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अ‍ॅफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | १२५०.०० | ४२.२८% जास्त | चतुर्थ लघुत्तम |
| २ | मे.जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | १०५७.०० | २०.३१% जास्त | **लघुत्तम** |
| ३ | मे. लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो लि. | १०७२.०० | २२.०२% जास्त | व्दितीय लघुत्तम |
| ४ | मे. एन. सी. सी. लि. | ११७९.८१ | ३४.२९% जास्त | तृतीय लघुत्तम |

५.५.३ वरील तपशिलानुसार मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा निविदेमध्ये नमूद अंदाजित किंमतीच्या २०.३१% जास्त इतक्या दराचा रु. १०५७ कोटी (रु एक हजार सत्तावन्न कोटी) किंमतीचा आर्थिक देकार लघुत्तम आढळून आला. मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा निविदेमध्ये नमूद अंदाजित किंमतीच्या २०.३१% जास्त इतक्या दराचा असल्याने याबाबत त्यांचेकडून

त्यांचे देकाराबाबत कारणमिमांसा मागविण्यात आली. यास अनुसरून मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी कारणमिमांसा सादर केली. सल्लागाराने या कारणमिमांसेची छाननी करून त्यांचे विश्लेषण सादर केले. निविदाकाराने सादर केलेली कारणमिमांसा आणि सल्लागाराने केलेले विश्लेषण निविदा समितीसमोर सादर करण्यात आली. याबाबत निविदा समितीने नोंदविलेली खालील निरीक्षणे कार्यकारी समितीस सादर करण्यात आली.

१. सदर कामाच्या निविदा दुसऱ्यांदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद म्हणून ४ निविदाकारांच्या स्पर्धात्मक निविदा प्राप्त झाल्या. यामध्ये लघुत्तम व व्दितीय लघुत्तम देकारांच्या किंमतीमध्ये फक्त रु. १५ कोटी (१.७१ %) इतका फरक आहे.

२. प्रकल्पाची अंदाजित किंमत सा.बां. विभागाच्या सन २०१९-२०२० च्या राज्यस्तरीय दरसूचीवर आधारित आहे. या दरसूचीच्या दरपृथ:करणामध्ये (Rate Analysis) मध्ये सदर प्रकल्पाचे गुंतागुंतीचे बांधकाम, मजुरांच्या राहण्याच्या व वाहतुकीसाठीचा अतिरिक्त खर्च, कंत्राटीय किमतीच्या ५% एवढया रकमेची कार्यारंभ आदेशापासुन ८ वर्षे मुदतीपर्यंत लागू असणारी बँकेची प्रतिपूर्ती हमी (Bank Guarantee) ही कामगिरी सुरक्षा ठेव म्हणून (Performance Security) देणेकरीताचा खर्च, प्रकल्पाकरीता करावयाच्या विशिष्ट प्रकारच्या यंत्रसामग्रीची किंमत / भाडे इ. बाबींचा अंर्तभाव नाही. सबब प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीत वरील बाबींचा समावेश नाही.

५.६ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी पुढे असे नमूद केले की, याबाबत सल्लागाराचे विश्लेषण व निविदाकाराचा देकार यातील तफावत पाहता प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या दिनांक ६ जानेवारी २०२० रोजी झालेल्या बैठकीत निविदाकार मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांना वाटाघाटीसाठी पाचारण करण्यात आले. या अनुषंगाने निविदाकाराने मूळ देकार किमतीत रु. ५,१३,६०,३१०/- इतक्या रक्कमेची सूट देऊन रु. १०५१,८६,३९,६९०/- इतक्या रकमेत सदर प्रकल्पाचे काम करण्याचे मान्य केले. उपरोक्त लघुत्तम देकार निविदेतील अटी व शर्तींची

पूर्तत: करणारा असल्याने मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांनी सादर केलेली निविदा स्वीकृत करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीकडे पाठविण्यास निविदा समितीने मान्यता दिली आहे.

५.७ महानगर आयुक्त यांनी प्रकल्पाची आखणी मुंबई शहराच्या अत्यंत वर्दळीच्या ठिकाणांतून आहे. सदर उड्डाणपुलाची उंची सर्वसाधारण उड्डाणपुलांपेक्षा बरीच जास्त असून प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. या बाबींचा विचार करता कंत्राटदाराचा रु. १०५१,८६,३९,६९०/- इतक्या रक्कमेचा सुधारीत देकार रास्त व वाजवी असून कार्यकारी समितीस मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे.

**निर्णय : चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १३८९ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे शिवडी ते वरळी या उन्नत मार्गाच्या प्रस्तावित कामासाठी मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची वाटाघाटीनंतर प्राप्त झालेला, निविदा किंमतीपेक्षा १९.७३ % जास्त असलेला रु. १०५१,८६,३९,६९०/- (रुपये एक हजार एक्कावन्न कोटी शहाऐंशी लाख एकोणचाळीस हजार सहाशे नव्वद) चा देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणारी भाववाढ, तात्पुरत्या रक्कमेतील (Provisional Sum) तरतूदी आणि संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे."

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समिती याव्दारे प्रकल्पास आवश्यक त्या सर्व वैधानिक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर आणि प्रकल्पाच्या आखणीतील बाधित बांधकामांच्या पुनर्वसनाबाबत योग्य ती कार्यवाही झाल्यानंतर कंत्राटदार मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांना कार्यारंभ आदेश देण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे."

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ६: मेट्रो मार्ग – ६ (स्वामी समर्थ नगर – जोगेश्वरी – विक्रोळी) भागाच्या प्रणाली कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची (General Consultant) नेमणूक करणेबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त (१) / प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग-६ (स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी – विक्रोळी) प्रकल्पास प्राधिकरणाच्या दि. १९ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या १४१व्या बैठकीत तसेच मंत्रिमंडळाच्या दि. २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत अंदाजित केलेल्या रू.६,७१६/- कोटी मूळ किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

६.२ त्यानंतर, वरिष्ठ संचालक (प्रणाली) एकत्रीकरण यांनी सदर प्रस्तावाचे पॉवर पॉईन्टद्वारे सादरीकरण केले आणि साधारण सल्लागाराची नेमणूक करण्यासंदर्भात माहिती देताना असे सांगितले की, दिल्ली मेट्रो रेल महामंडळामार्फत मेट्रो मार्ग-६ प्रकल्पाच्या स्थापत्य कामाची अंमलबजावणी करण्यात येत असून प्रणाली कामे प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहेत. प्रणाली भागात मुख्यत्वे रोलिंग स्टॉक, संकेत व दूरसंचार, वीजपुरवठी व ट्रॅक्शन, ई अँड एम स्टेशन्स व डेपो, ए.एफ.सी., पी.एस.डी., उद्वाहन, सरकते जीने, इत्यादी कामासाठी प्राधिकरणाने गुणवत्ता व आर्थिक निकष आधारित (Quality and Cost Based Selection (QCBS) तत्त्वावर मेट्रो कामाच्या अनुभवावर आधारित प्रणाली कामांसाठी साधारण सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. निविदेतील कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे :-

- नमूद मेट्रो मार्गांच्या प्रणाली कामांची दैनंदिन देखरेख करणे.
- नमूद मेट्रो मार्गांच्या निविदा कागदपत्रे, आराखडा तयार करणे आणि प्रणाली निविदांचे मुल्यमापन करण्याकरिता सर्व आवश्यक सहाय्य प्रदान करणे.
- नमूद मेट्रो मार्गांच्या डेपोच्या प्रणाली कामांची दैनंदिन देखरेख करणे.
- नमूद मेट्रो मार्गांच्या कामांची चाचणी आणि प्रणाली सुरु करणे.

६.३ वरिष्ठ संचालक (प्रणाली) एकत्रीकरण यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग ६ च्या प्रणाली कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची नियुक्ती करण्याकरीता ई-निविदा मागविण्यासाठी दैनिक 'लोकमत' तसेच 'हिंदुस्थान टाईम्स' या वृत्तपत्रात दिनांक १४ सप्टेंबर, २०१९ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेऊन उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर

प्रसिध्द करण्यात आले. दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजी ४ ई-निविदा प्रस्ताव प्राप्त झाले. दिनांक ०५ डिसेंबर, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता लिफाफा 'अ' (निविदा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई- निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | M/s. Consortium of DB Engineering & Consulting GmbH & DB Engineering & Consulting India Pvt. Ltd. |
| २ | M/s. Consortium of Egis Rail S.A , AECOM India Pvt. Ltd & EGIS India consulting Engineers Pvt. Ltd. |
| ३ | M/s. Consortium of Rodic Consultants Pvt. Ltd. & Artelia SAS |
| ४ | M/s. Consortium of SYSTRA , Systra MVA Consulting (India) Pvt. Ltd. & Consulting Engineers Group Ltd. |

६.४ निविदेतील निकषांनुसार सल्लागारांच्या पुढील बाबींचे तांत्रिक मूल्यांकन केले :-

१) मेट्रो प्रकल्पाचा विशिष्ट अनुभव - किमान तीन प्रकल्पांचा अनुभव आवश्यक.

२) सल्लागाराची प्रस्तावित कार्यपद्धती व नियोजन, दावे व्यवस्थापन व प्रशिक्षण योजना.

३) सल्लागाराच्या तज्ञांचा मेट्रो विषयक अनुभव, पात्रता व क्षमता

४) आंतरराष्ट्रीय तज्ञांची उपलब्धता

निविदेतील अटी शर्ती नुसार M/s. Consortium of Rodic Consultants Pvt. Ltd. & Artelia SAS हा निविदाकार निविदा प्रस्तावातील नमूद खंड १.१.३.१ (vi) नुसार अपात्र असल्यामुळे त्याचा आर्थिक देकार उघडण्यात आला नाही.

तांत्रिक छाननी अहवालानुसार पात्र निविदाकारांच्या प्राप्त गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त तांत्रिक गुण (७५००) |
|---|---|---|
| १ | M/s. Consortium of DB Engineering & Consulting GmbH & DB Engineering & Consulting India Pvt. Ltd. | ६९४६.५० |
| २ | M/s. Consortium of Egis Rail S.A , AECOM India Pvt. Ltd & EGIS India consulting Engineers Pvt. Ltd. | ६८८९.५० |
| ३ | M/s. Consortium of SYSTRA , Systra MVA Consulting (India) Pvt. Ltd. & Consulting Engineers Group Ltd. | ७२०६.०० |

दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी निविदा शिफारस समितीने, तांत्रिक मूल्यमापन छाननी अहवालाची शिफारस केली. त्यानुसार तीन पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी उघडण्यात आले.

प्राप्त वित्तीय सर्व निविदाकारांची प्रस्तावातील किंमत ही भारतीय चलनातच देण्यात आली आहे. त्याचा रुपयात तपशील खालीलप्रमाणे: -

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | एकूण (रु.) |
|---|---|---|
| १ | M/s. DB Engineering & Consulting GmbH & DB Engineering & Consulting India Pvt ltd आणि समुह/संयुक्त उपक्रम | ७०,३१,५०,८८०/- |
| २ | Egis Rail S.A , AECOM India Pvt. Ltd & EGIS India consulting Engineers Pvt. Ltd. आणि समुह/संयुक्त उपक्रम | ६३,४२,३१,७५०/- |
| ३ | SYSTRA , Systra MVA Consulting (India) Pvt. Ltd. & Consulting Engineers Group Ltd. आणि समुह/संयुक्त उपक्रम | ७०,४०,२८,३००/- |

सदर निविदेत तांत्रिक गुणांना ७५% भार आणि आर्थिक देकार २५% भार देण्यात आले.

त्यानुसार निविदाकारांचे संयुक्त गुण खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ.क्र | निविदाकारांचे नाव | तांत्रिक गुण (७५००) | आर्थिक गुण (२५००) | संयुक्त गुण (१००००) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | M/s. Consortium of SYSTRA , Systra MVA Consulting (India) Pvt. Ltd. & Consulting Engineers Group Ltd. | ७२०६.०० | २२५२.१५ | ९४५८.१५ | १ |
| २ | M/s. Consortium of Egis Rail S.A , AECOM India Pvt. Ltd & EGIS India consulting Engineers Pvt. Ltd. | ६८८९.५० | २५००.०० | ९३८९.५० | २ |
| ३ | M/s. Consortium of DB Engineering& Consulting GmbH & DB Engineering & Consulting India Pvt., Ltd. | ६९४६.५० | २२५४.९६ | ९२०१.४६ | ३ |

६.५ वरिष्ठ संचालक (प्रणाली) एकत्रीकरण यांनी पुढे असे सांगितले की, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी निविदा शिफारस समितीने निविदेतील अटीं व शर्तीनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल संयुक्त गुण संपादन करणाऱ्या निविदाकाराच्या प्रस्तावाची म्हणजे M/s SYSTRA , Systra MVA Consulting (India) Pvt. Ltd. & Consulting Engineers Group Ltd. यांची शिफारस केली.

६.६ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, सदर निविदाकाराचा आर्थिक देकार रु. ७०,४०,२८,३००/- (वस्तू व सेवाकर वगळून) अंदाजित निविदा किंमतीपेक्षा (-) ८.२% कमीचा वाजवी व रास्त आहे. पूर्वी दिल्ली मेट्रो रेल महामंडळाकडे मेट्रो मार्ग ६ या संपूर्ण प्रकल्पाची जबाबदारी होती. त्यात प्रणालीच्या कामाचे अंदाजित मूल्य हे रु.२१२४ कोटी असुन त्यासाठी दिल्ली मेट्रो रेल महामंडळाकडून सल्लागार सेवेसाठी ६% शुल्क आकारण्यात येणार होते. त्याचे अंदाजित मूल्य रु.१२७.४४ कोटी एवढे होते. सदर प्रकल्पाच्या प्रणालीच्या कामाची प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्राधिकरणामार्फत M/s. SYSTRA , Systra MVA Consulting (India) Pvt. Ltd. & Consulting Engineers Group Ltd. यांचा ई निविदा प्रस्ताव मान्य झाल्यास प्राधिकरणाची अंदाजित रु.५७.०४ कोटीची बचत होईल.

**निर्णय: चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**<u>ठराव क्र. १३९० :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे Consortium of M/s Systra , M/s Consulting Engineers Group Ltd. and M/s Systra MVA Consulting (India) Pvt. Ltd. यांचा रु.७०,४०,२८,३००/- वस्तू व सेवाकर वगळता एवढया किंमतीचा वाजवी व रास्त देकार स्विकारण्यास व साधारण सल्लागार (GC) म्हणून नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने करारनाम्यातील होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ७: मालवणी मुंबई येथील मेट्रो डेपोत कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामासाठी मागविलेल्या ई-निविदेसाठी मंजूरी देणेबाबत.**

७.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग–७ अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) या प्रकल्पाची व्याप्ती व जलदगतीने अंमलबजावणीसाठी स्थापत्य व प्रणाली कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच मेट्रो मार्ग २अ डी.एन नगर ते दहिसर चे कामसुध्दा प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत दोन्ही मेट्रो मार्गासाठी मालवणी मेट्रो डेपोमधुन वरील दोन्ही मेट्रो मार्गांचे देखभाल दुरुस्ती करण्याचे काम प्रस्तावित आहे. देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारे अधिकारी व कर्मचा-यांसाठी मालवणी डेपोमध्ये निवासस्थाने बांधणे गरजेचे आहे. मालवणी येथील कर्मचारी निवासस्थानांच्या आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व बांधकाम पर्यवेक्षण इ. कामांसाठी मे. टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून दिनांक ०५/०४/२०१८ रोजी नियुक्त करण्यात आले आहे.

७.२ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) / प्रकल्प संचालक यांनी निवासस्थानांच्या बांधकामासंबंधी पॉवर पॉईन्टव्दारे सादरीकरण केले आणि प्रस्तावाबाबत माहिती देताना सांगितले की, मालवणी डेपोमधील लेआऊटमध्ये आरक्षित केलेल्या जागेवर १BHK, २BHK, ३BHK असे प्रत्येकी वीस मजल्याच्या तीन बहुमजली इमारती कर्मचारी निवासस्थानांसाठी प्रस्तावित आहेत. त्यातील कर्मचारी निवासस्थानांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे :-

| **निवासस्थानाचा प्रकार** | **चटई क्षेत्रफळ** | | **एकूण क्वॉटर्सची संख्या** |
|---|---|---|---|
| | **चौ.फुट** | **चौ.मी** | |
| १ BHK | ६५७ | ६१.०५ | ७८ |
| २ BHK | ८८५ | ८२.२५ | ७८ |
| ३ BHK | १३३२ | १२३.७९ | ३८ |
| एकूण | | | १९४ |

सदर कामाच्या व्याप्तीमध्ये स्थापत्य कामे, विदयुत कामे, PHE, Fire Fighting, लिफ्ट, सी.सी. टी. व्ही. इत्यादी. कामे समाविष्ट आहेत. सदर कामाची अंदाजित निविदा रक्कम रु. ८५,२४,५८,५४२/- इतकी असून प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी ३६ महिने इतका असणार आहे.

७.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) / प्रकल्प संचालक यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाने मालवणी येथील कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामाकरिता, ई-निविदा (पहिली मागणी) मागविण्यासाठी टाईम्स ग्रुपच्या इंग्रजी व मराठी दैनिक वृत्तपत्रात दिनांक २०/०९/२०१९ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करून ती प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आली. त्यानुसार दिनांक १८ ऑक्टोबर, २०१९ च्या निविदापूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक २१ जानेवारी, २०२० होती. परंतु ई-निविदा पोर्टलच्या तांत्रिक अडचणीमुळे सदर ई-निविदेस फक्त दोन निविदाकारांस निविदा सादर करु शकले. यास्तव सदर निविदेची द्वितीय मागणी दैनिक प्रहार व daily English Newspaper Free press Journal मध्ये दिनांक ०८/०२/२०२० रोजी पुन्हा प्रसिध्द करून, ती प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आली. दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या निविदापूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० होती. दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता लिफाफा 'अ' (निविदा किंमत) व ब'(तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले:

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | मे. सोम प्रोजेक्ट प्रा. लि. |
| २ | मे. एन.ए. कस्ट्रक्शन प्रा. लि. |
| ३ | मे. वित्राग इन्फ्रा. प्रोजेक्ट. लि. |
| ४ | मे. कल्पना स्ट्रकॉन प्रा.लि. |
| ५ | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. |
| ६ | मे. सॅटेलाईट डेव्हलपर्स प्रा.लि |

७.४ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) / प्रकल्प संचालक यांनी पुढे असे नमूद केले की, सदर कामाची निविदा, अंदाजपत्रक, निविदेची तांत्रिक छाननी इ. कामे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी केले तसेच त्यांच्या प्राप्त अहवालानुसार मे. वित्राग इन्फ्रा. प्रोजेक्ट. लि. व मे. एन.ए. कस्ट्रक्शन प्रा. लि. हे निविदाकार अपात्र ठरले असून उर्वरित चार निविदाकार पात्र ठरले आहेत. मे. एन.ए. कस्ट्रक्शन प्रा. लि.यांनी सादर केलेले काम, निविदेत दिलेल्या पंधरा मजल्यासंदर्भातील पात्रता निकषांची पूर्तता करीत नाही कारण त्यांनी तांत्रिक प्रस्तावात सादर केलेले काम फक्त २ बेसमेंट + स्टिल्ट + १२ मजले एवढेच असल्यामुळे अपात्र ठरले.

तसेच मे. वित्राग इन्फ्रा. प्रोजेक्ट. लि.यांनी सादर केलेल्या कामाची पूर्णत्वाची किंमत हि निविदेतील अटी व शर्ती नुसार रक्कम रु. ६८ कोटी (अंदाजित रक्कमेच्या ८०%) एवढी नसल्यामुळे त्यांची निविदा तांत्रिक निकषांच्या आधारावर अपात्र ठरली. तदनंतर, तांत्रिक दृष्ट्र्या पात्र चार निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा क) दिनांक २०/०३/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात आले. तांत्रिकदृष्ट्र्या पात्र चार निविदाकारांचे प्राप्त वित्तीय प्रस्ताव खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) (सर्व करासह) | प्राप्त देकार (रु. कोटी) (सर्व करासह) | % अधिक/ कमी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. सोम प्रोजेक्ट प्रा. लि. | ८५.२४ | ८८.५७ | (+) ३.९१ | ३ |
| २ | मे. कल्पना स्ट्रकॉन प्रा.लि. | | ८६.७८ | (+) १.८० | २ |
| ३ | **मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि.** | | **७८.५७** | **(-) ७.८३** | **१** |
| ४ | मे. सॅटेलाईट डेव्हलपर्स प्रा.लि. | | ९१.९७ | (+) ७.८९ | ४ |

७.५ मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचा लघुत्तम देकार हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी असल्यामुळे त्यांच्याकडून दिनांक २४/०३/२०२० रोजी स्पष्टीकरण मागविण्यात आले होते त्यावर निविदाकाराने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले :-

१. Batch Mix Plant प्रस्तावित जागेवर स्थापित करून वेळ वाचविणार आहे.
२. निविदाकाराकडे अभियांत्रिकी कर्मचारी, कुशल आणि अकुशल कामगार उपलब्ध आहेत. तसेच निविदाकाराचे स्वतःचे M.S. shuttering & scaffolding material, concrete pump , cutting machine, Tower Cranes आहेत.
३. जागतिक बाजारामध्ये तेलाच्या किमती उतरल्यामुळे देखभाल व दुरुस्तीचा खर्च मर्यादित राहील.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने लघुत्तम निविदाकाराकडून आलेल्या स्पष्टीकरणाचे पुनर्वलोकन करून वित्तीय छाननी अहवाल दिनांक २७/०३/२०२० रोजी सादर केला आणि निविदा स्विकारण्याची शिफारस केली.

७.६ महानगर आयुक्त यांनी गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीने दिनांक ३०/०३/२०२० रोजी (https://call.lifesizecloud.com/१६०३१९५) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्याबैठकीमध्ये

निविदाकाराने दिलेली कारणे आणि स्पष्टीकरण तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने केलेला पुनर्वलोकन अहवाल यांचे अवलोकन करुन लघुत्तम निविदाकार मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांच्या रु. ७८,५७,११,०३८.१६ (सर्व करासह) निविदा रक्कमेपेक्षा (-) ७.८३% लघुत्तम निविदा वाजवी व रास्त असल्यामुळे स्विकारण्याची शिफारस केली.

**निर्णय: चर्चेनंतर, बाब टिपणीतीत प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**<u>ठराव क्र. १३९१ :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मालवणी, मुंबई येथील मेट्रो डेपोत कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामासाठी मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचा रु. ७८,५७,११,०३८.१६ (सर्व करासह) निविदा रक्कमेपेक्षा (-) ७.८३% लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ८अ: प्राधिकरणाचे दिनांक ३०.०९.२०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३०.०९.२०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने दिनांक ३०.०९.२०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्याची नोंद घेतली व लेख्यास मान्यता दिली.

**निर्णय: प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**<u>बाब क्र. ८ब:</u> <u>प्राधिकरणाचे दिनांक ३०.१२.२०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३०.१२.२०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने दिनांक ३०.१२.२०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्याची नोंद घेतली व लेख्यास मान्यता दिली.

**निर्णय: प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**<u>बाब क्र. ९अ:</u> <u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक ०१ जुलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने ०१ जुलै, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने ०१ जुलै, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय: सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**<u>बाब क्र. ९ब:</u> <u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने ०१ ऑक्टोबर, २०१९ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने ०१ ऑक्टोबर, २०१९ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय: सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ९क: प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल — दिनांक ०१ जानेवारी, २०२० ते ३१ मार्च, २०२०.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने ०१ जानेवारी, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने ०१ जानेवारी, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय: सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले विषय :**

महानगर आयुक्त यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, मुंबई मेट्रो -१ प्रा.लि. यांचेकडून सदर मेट्रो-१ चे परिचालन व परीरक्षण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे अधिग्रहन करावे असा प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झालेला आहे.

या अनुषगांने सदरचे अधिग्रहनाकरिता आवश्यक प्रकिया करण्यासाठी निविदेद्वारे सल्लागार नियुक्त करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली.

त्यानुसार, कार्यकारी समितीने उपरोक्त प्रस्तावास मान्यता दिली व खालील ठराव मंजूर केला :-

**निर्णय: चर्चेनंतर, उपरोक्त प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र. १३९२:-**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई मेट्रो-१ प्रा.लि.यांनी प्राधिकरणास सादर केलेला मेट्रो- १ चे परिचालन व परीरक्षण करण्यासाठीच्या प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी निविदेद्वारे सल्लागार नियुक्ती करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********